IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): ठाणे शहर P.S.(ठाणे): मुंब्रा Year (वर्ष): 2021
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0579 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 16/06/2021 18:26 बजे

2.
| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): गुरूवार
Date From (दिनांक पासून): 03/06/2021
Time Period (कालावधी): पहर 7
Date To ( दिनांक पर्यंत): 03/06/2021
Time From (वेळेपासून): 21:20 बजे
Time To (वेळेपर्यंत): 21:47 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 16/06/2021 Time (वेळ): 17:10 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
Entry No. (नोंद क्र.): 053 Date & Time (दिनांक आणि वेळ): 16/06/2021 17:54 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 2 किमी
Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): शंकरमंदिरा समोरील रस्त्यावर, मुंब्रा,ठाणे

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) Name (नाव): जिलानी रफीक पठाण
(b) Father's Name (वडील चे नाव) : रफीक पठाण
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1989 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.): Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 9,मावदेवी रोड, संजयनगर,गरीब नवाज चाळ,मुंब्रा ,ठाणे ,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | 9,मावदेवी रोड, संजयनगर,गरीब नवाज चाळ,मुंब्रा ,ठाणे ,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7045118880

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उदय भास्कर विरपण | | | 1. मुंब्रा पोलीस स्टेशन,मुंब्रा ,ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

**13.Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): MARUTI SHANKAR ANDHALE
**Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, अचूक नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.** (आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

Name (नाव):

Rank(पद):

No.(नं.): PI



Scanned with CamScanner

मी जिलानी रफीक पठाण, वय.32 वर्षे, धंदा-किराणा दुकान, रा. रुम नं.09, गरीब नवाज चाळ, गावदेवी रोड, संजयनगर मुंब्रा ठाणे मो.नं.7045118880 असा असून समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर राहून जबाब लिहून देतो की,

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे जन्मापासुन राहण्यास आहे. माझे सोबत माझे आई वडील, भाऊ, वहिणी तसेच माझी पत्नी साईमा असे राहण्यास आहे. मी व माझा भाऊ ईकबाल असे आमचे दोघांचे मिळुन रहाते घराच्या बाजुला रुम नं.10, गरीबनवाज चाळ, संजयनगर मुंब्रा येथे स्वतःचे मालकीचे "लकी अरमान जनरल स्टोअर्स" नावाचे किराणा मालाचे दुकान सुमारे 04 वर्षोपासुन आहे. सदर किराणा मालाचे दुकानावर आमचे कुटुंबाचा उदर निर्वाह चालु आहे.
आमच्या दुकानामध्ये किराणा मालाचे साहित्याची विक्री आंम्ही करीत असतो. सुमारे एक वर्षोपुर्वी लॉकडाऊनच्या आधी दुकानामध्ये विक्री करण्याकरीता 'विमल' पान सुपारी ठेवली होती. त्यापैकी काही विमल सुपारीचा माल हा दुकानात ठेवला होता.
दि.31/05/2021 रोजी मुंब्रा पोलीस स्टेशन येथील पोलीस उदय किरपण व इतर 04 व्यक्ती हया आमच्या लकी अरमान जनरल स्टोअर्सच्या दुकानात आल्या. त्यानंतर उदय किरपन नावाच्या पोलीस यांनी माझे भावास दुकानात गांजा विकतो काय? अशी विचारणा केली. तसेच दुकानातील काऊंटरवरील ईतर माल खाली टाकून दिला. दुकानात पुर्वीपासुन असलेला विमल पान सुपारीचा माल एका गोणीमध्ये सर्वांनी भरला. त्यावेळी माझे भावाने गांजा विक्री करीत नसल्याबाबत ओरडून सांगत असताना देखिल पोलीस उदय किरपण व इतर हे गोणी व माझा भाऊ ईकबाल यांस दुकानातुन घेवुन मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गेले. काही वेळानंतर मी माझी पत्नी, आई व वहीनी असे आंम्ही सर्वजण मुंब्रा पोलीस स्टेशन येथे जावून पोलीस उदय किरपण यांना भेटलो. त्यावेळी उदय किरपण यांच्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करीत असलेला इसम अरबाज याने माझे भावाला व मला गांजा केसमधून सोडण्यासाठी उदय किरपण हे 2 लाख रुपये मागत असून ते त्यांना दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना आमच्याकडे इतके पैसे नसल्याबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही पोलीस उदय किरपण यांच्याकडे खुप रिक्वेस्ट केली परंतु उदय किरपण यांनी आमचे काहीएक ऐकले नाही. त्यावेळी आई व वहीनी रडायला लागल्यानंतर उदय किरपण यांनी रू. 1,50,000/- इतके रक्कम देण्यास सांगितली. त्यावेळी उदय किरपण यांच्या सांगणेप्रमाणे माझ्या पत्नीने रू.30,000/- मुंब्रा पोलीस स्टेशनमधील डी.बी. रुमच्या बाजूस असलेल्या रुममधील ड्रॉवरमध्ये टाकले. त्यानंतर काही वेळाने उदय किरपण यांनी माझे भावास सोडून दिले व सोबत नेलेला विमल गुटखा व इतर सामान ठेवलेली गोणी देखील परत केली. त्यानंतर दि. 02/06/2021 रोजी रात्री 21:52 वा.चे सुमारास मला माझे मोबाईल मो.नं.7045118880 वर उदय किरपण यांचेसोबत खाजगी ड्रायव्हरचे काम करणारा मुलगा अरबाज याने त्याचे मोबाईल नं. 8976786215 वरुन फोन केला. त्यावेळी अरबाज याने "उदय किरपण हे उर्वरीत रू. 1,20,000/- मागत आहेत लवकर पैसे देवुन मॅटर संपुन टाक " असा मला निरोप दिला. माझे व अरबाज याचेतील फोनवरील कॉल मी रेकॉर्ड केला तो कॉल अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात दिला आहे. पोलीस उदय किरपण यांनी मागणी केलेली रक्कम त्यांना न दिल्यास ते मला व भावाला ते अटक करतील अशी धमकी दिली होती. त्यानंतर मी माझा मित्र व पोलीसांशी संपर्क असलेला अशरफ अली शेख उर्फ गुड्डू याला उदय किरपण यांची भेट घेण्यास सांगितले असता, उदय किरपण यांनी गुड्डूकडे देखिल मला रू. 1,20,000/- आणून देण्याचा निरोप दिला आहे. मुंब्रा पोलीस स्टेशन येथील पोलीस उदय किरपण यांनी माझेकडे मागणी केलेली रक्कम त्यांनी देण्याची माझी इच्छा नव्हती म्हणून मी मुंब्रा पोलीस स्टेशन येथील पोलीस उदय किरपण यांच्याविरूध्द दि. 03/06/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात लाचेच्या मागणीची तक्रार दिली आहे.
मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीचे अनुशंगाने लाचेची पडताळणीकामी पोनि शिवराज बेंद्रे, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी मागणी केलेवरून ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यालयातील 1) श्री. प्रशांत शामराव सोनावणे, लिपीक, 2) श्री. सुनिल सुदाम कांबळे, लिपीक दोन्ही नेमणूक घनकचरा व्यवस्थापन विभाग, ठाणे महानगर पालिका, ठाणे दि. 03/06/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर झाले. त्यावेळी पोनि शिवराज बेंद्रे यांनी नमुद पंचांची मला ओळख करून देवून ते पंच साक्षीदार असल्याबाबत मला सांगितले. तसेच नमुद पंच साक्षीदार यांना माझी तक्रारदार म्हणून ओळख करून दिली.
त्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांनी मला दिलेल्या सुचनेप्रमाणे वरील दोन्ही पंचांना मी मुंब्रा पोलीस स्टेशन येथील पोलीस श्री. उदय किरपण यांच्याविरूध्द दिलेल्या लाचेच्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगितली. माझे चौथी पर्यत उर्दु भाषेत शिक्षण झाले असल्याने मला मराठी व हिंदी लिहीता वाचता येत नाही परंतु मला मराठी व हिंदी बोलता येत असल्यामुळे दोन्ही पंचांसमक्ष माझे सांगणेप्रमाणे माझी तक्रार मराठीमध्ये संगणकावर टंकलिखीत करण्यात येत असल्याबाबत पोनि शिवराज बेंद्रे यांनी मला व दोन्ही पंचांना सांगितले. त्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांनी माझे सांगणेप्रमाणे माझी तक्रार पंच तसेच माझा मित्र अशरफ अली शेख उर्फ गुड्डू याचेसमक्ष संगणकावर टंकलिखीत केली. सदरची तक्रार माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची पंचांनी खात्री केल्यानंतर मी त्यावर उर्दु भाषेत सही केली आहे. तसेच

Scanned with CamScanner

माझेनंतर दोन्ही पंचांनी व पोनि शिवराज बेंद्रे यांनी समक्ष म्हणून त्यावर सही केली आहे.

त्यानंतर दि. 03/06/2021 रोजी मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीचे अनुषंगाने पंच साक्षीदार यांच्यासमक्ष केलेल्या लाचेच्या मागणीचे पडताळणी दरम्यान मी माझा मित्र श्री. अशरफ अली शेख उर्फ गुड्डू यांचेसह मुंब्रा पोलीस स्टेशनचे पोलीस उदय किरपण यांना त्यांनी बोलविले ठिकाणी मुंब्रा येथील शंकर मंदीराजवळ भेटलो. त्यावेळी आमच्या पाठोपाठ पंच व पोशि/चौगले असे अँटो रिक्षाने सदर ठिकाणी आले. त्यावेळी गुड्डू यांने उदय किरपण यांना मी सोबत असल्याबाबत सांगितले. त्यावेळी मी उदय किरपण यांना " हा साब सुनो ना...साब साब करू क्या कुछ अभी...कल करू तो चलेगा आप बोलो..." असे बोलत त्यांनी मागणी केलेली रक्कम उदया देतो असे सांगितले. त्यावेळी उदय किरपण यांनी मला " देख जो कमेटमेंट हुई है वो आयेगी तो ठिक... नही तो मेरे को नही चाहिए..." असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना " सर मै....मेरी एक बात सुनो ना...अभी जो है ना रात तक कुछ भी करके ना पचास देता हूँ " " सर सुबह तुमको कसम खुदा की सुबह तुम्हारे ड्युटी के आने के एक घंटे तक मिल जाएगा सर..." असे बोलून आता पन्नास हजार देतो व उर्वरीत रक्कम उदया सकाळी देतो असे सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. उदय किरपण यांनी मला " तेरे वजह से उसका धंदा बंद हो जाएगा ध्यान में रख " " सिनियर ने सिनीअर साहब ने उसको बुलाया था मोरेश को...क्लब बंद कर देगा... जो कमेटमेंट हुई है भाई वो कमेंटमेंट " असे सांगितले. त्यावेळी माझा मित्र अशरफ अली शेख याने उदय किरपण यांच्याकडे " अभी कितना करनेका हैं...." अशी विचारणा करता, उदय किरपण यांनी आंम्हाला "एक बीस कमेंटमेंट हुई है एक बीस देने के लिए बोलो." असे बोलून उदय किरपण यांनी माझेकडे मागणी केलेल्या रक्कमेपैकी उर्वरीत रक्कम रु. 1,20,000/- देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना एका तासामध्ये पन्नास हजार आणून देतो असे सांगितले असता, श्री. उदय किरपण यांनी मला एका तासामध्ये पैसे घेवून येण्यास सांगुन उर्वरीत पैसे उदया बाराचे आतमध्ये देण्यास सांगितले. त्यावेळी माझा मित्र गुड्डू याने मला व माझे भावाला अटक करून नका असे पोलीस उदय किरपण यांना सांगितले असता, उदय किरपण यांनी " अॅरेस्ट क्या मै क्या मेरेको को बहोत मालूम है किधर नाम डालना है...." असे बोलून आंम्ही पैसे नाही दिले तर आमची गुन्हयात नावे टाकतील असे सांगितले. त्यानंतर मी व गुड्डू असे अॅक्टीवा स्कुटरवरून पडताळणी पथकाकडे परत निघून येत असता, एक इसम आमच्या पाठोपाठ येत असल्याचे आंम्हास जाणवले. सदरचा इसम उदय किरपण यांनी पाठविला असल्याची शक्यता असल्यामुळे आम्ही थोडावेळ एका दुकानाचे बाहेर थांबलो. सदर ठिकाणी सोडा पिल्यानंतर आम्ही तेथून पडताळणी पथकाकडे येण्यास निघालो. त्यावेळी पंच व पोशि/चौगले हे अँटोने आमच्या पाठोपाठ येत असल्याचे मी पाहीले होते.

पडताळणी पथकाकडे परत आल्यानंतर पो.उप.अधी. ज्योती देशमुख व पोनि शिवराज बेंद्रे यांनी घडलेल्या घटनाक्रमाबाबत माझेकडे व पंचांकडे विचारणा केली असता मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली आहे. तसेच माझे व उदय किरपण यांचे समक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण त्यांनी ऐकून त्याबाबत खात्री करून घेतली.

सदर लाचेच्या पडताळणी दरम्यानं मुंब्रा पोलीस स्टेशन येथील पोलीस उदय किरपण यांनी माझेकडे आमचेत यापुर्वी ठरलेल्या रक्कमेतील उर्वरीत रक्कम रू. 1,20,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी केली आहे. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून रू. 50,000/- एका तासात घेवून येण्यास उदय किरपण यांनी मला सांगितले असल्याबाबत स्पष्ट झाल्याने लोकसेवक उदय किरपण यांच्याविरुध्द लाचेचा सापळा आयोजित करण्यात येत असल्याबाबत पो.उप.अधी. ज्योती देखमुख व पोनि शिवराज बेंद्रे यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकास सांगितले.

त्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांनी मला लाचेची रक्कम रू. 50,000/- हजर करण्यास सांगितले असता त्यावेळी मी माझेकडे असलेली लाचेची रक्कम रू. 50,000/- त्यामध्ये रू. 500/- दराच्या 100 चलनी नोटा लाचेची रक्मेकामी हजर केल्या. त्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांनी मला सापळापुर्व कारवाईची माहीती देवून सापळापुर्व कारवाई शासकीय वाहनामध्ये पुर्ण केली. त्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांचे सुचनेवरुन पोहवा/गिरासे यांनी पंचनामा साहित्याच्या बॅगमधुन अॅन्थ्रासीन पावडरची डबी काढुन अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला तसेच पंचाना समजावुन सांगीतले. त्यांनतर मी लाचेकामी हजर केलेल्या लाचेच्या रकमेस भरपुर प्रमाणात अॅन्थ्रासीन पावडर पोहवा/गिरासे यांनी लावून त्याबाबतचे प्रात्यक्षिक आंम्हाला करून दाखविले. त्यानंतर लाचेची रक्कम रू. 50,000/- माझे पॅन्टचे पुढील उजवे खिशामध्ये ठेवण्यात आली.

त्यानंतर माझा मित्र अशरफ अली शेख उर्फ गुड्डू याने त्याचे मोबाईलवरून पोलीस उदय किरपण यांना फोनकरून ते सध्या कुठे आहेत? याबाबत विचारणा केली असता, उदय किरपण यांनी कौसा येथील पेट्रोलपंप समोर येण्यास आहे असे गुड्डू याने पोनि शिवराज बेंद्रे यांना सांगितले. त्याप्रमाणे मला माझे मित्र गुड्डू याचे सोबत लाचेची रक्कम घेवून उदय किरपण यांना कौसा पेट्रोलपंप येथे भेटण्यास सांगून

Scanned with CamScanner

त्याप्रमाणे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले होते.

त्याप्रमाणे मी व गुड्डू असे माझे अँक्टीवा नं. एम.एच.04 जे.जी. 6279 स्कुटरवरून उदय किरपण यांनी सांगितलेप्रमाणे कौसा पेट्रोलपंप जवळ गेलो. त्यावेळी सापळा पथक व पंच प्रवासी अँटो रिक्षाने आमचे पाठोपाठ सदर ठिकाणी पोहचले. त्यावेळी कौसा पेट्रोलपंप समोर उदय किरपण हे न दिसल्यामुळे गुड्डूने त्यांचे मोबाईलवरून उदय किरपण यांना फोन केला. त्यावेळी उदय किरपण यांनी आम्हास तसेच शिळफाटा रस्त्याने पुढे येण्यास सांगितले. त्यावेळी सदर ठिकाणी कोणीतरी माझेवर लक्ष ठेवून असल्याचे मला जाणवले. त्यानंतर गुड्डूने पोलीस उदय किरपण यांना फोन केला व त्यांचे निरोपाप्रमाणे आम्ही कौसा पेट्रोलपंपा पारून काही अंतर पुढे गेल्यानंतर पुन्हा गुड्डूने उदय किरपण यांना फोन केला असता, उदय किरपण यांनी थोडे पुढे येण्यास सांगून रस्त्याच्या बाजूस उभे असल्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे काहीअंतर पुढे गेल्यानंतर गुड्डू यांस उदय किरपण रस्त्याच्या कडेला उभे असल्याचे दिसले. त्यामुळे त्याने मला गाडी बाजूस घेण्यास सांगितल्याप्रमाणे मी गाडी रस्त्याच्या कडेला थावविली. त्यानंतर मी व गुड्डू असे सर्व्हीस रोडवर उभे असलेल्या उदय किरपण यांच्याजवळ गेलो. त्यावेळी गुड्डूने उदय किरपण यांना " इतना आगे पिछे आगे पिछे " अशी विचारणा केली. त्यावर उदय किरपण यांनी " उधर फहीम भाई खडा था " असे सांगून जवळ बोलाविले. त्याप्रमाणे आम्ही त्यांच्या जवळ गेल्यानंतर उदय किरपण यांनी माझेकडे " तेरेको कोणसा काम दिया नार्कोटीक्स ने " अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना नार्कोटिक्सला कोणतेही काम दिले नसल्याबाबत सांगितले. त्यानंतर ते पुढे निघून जात असताना मी उदय किरपण यांना त्यांनी मागितलेल्या रक्कमेपैकी दहा वीस हजार कमी करण्याची विनंती करून त्यांना थोडे थोडे करून पैसे देतो असे सांगितले. त्यावेळी उदय किरपण हे आमच्या जवळ उभे न राहता इकडे तिकडे पाहत फिरत होते. त्यावेळी गुड्डूने उदय किरपण यांना " क्या देख रहे हो इधर उधर समज मे नहीं आ रहा " अशी विचारणा केली असता, उदय किरपण यांनी गुटख्याची गाडी जाणार असून सदर गाडी जावून दयायची नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत असताना एक इसम त्यांच्या जवळ येवून उदय किरपण यांना एका बाजूस घेवून गेला. त्यावेळी सदरचा इसम व उदय किरपण हे आजूबाजूस पाहत फिरत होते. त्यानंतर काहीवेळाने ते पुन्हा रस्त्यावर उभ्या असलेल्या इर्टिगा गाडीजवळ आले. त्यावेळी त्यांनी गुड्डूस आवाज देवून त्यांचे गाडीजवळ बोलावून घेतले. त्यानंतर गुड्डू पुन्हा माझेजवळ आला व त्यांने, उदय किरपण यांने पैसे घेवून उदया सकाळी 12 वाजता पोलीस स्टेशनमध्ये येण्यास सांगितले असल्याबाबत मला सांगितले. त्यानंतर उदय किरपण सदर ठिकाणावरून इर्टिगा गाडीमधून निघून गेल्यानंतर आम्ही देखिल परत फायर स्टेशनच्या दिशेने निघून सापळा पथकाजवळ आलो. त्यानंतर पोशि/चव्हाण यांनी माझेकडील डिजीटल रेकाँर्डर बाहेर काढून तो बंद केला.

सापळा पथकाकडे परत आल्यानंतर पो.उप.अधी. ज्योती देशमुख व पोनि शिवराज बेंद्रे यांनी घडलेल्या घटनाक्रमाबाबत माझेकडे व माझा मित्र अशरफ अली शेख उर्फ गुड्डे यांचेकडे विचारणा केली असता आम्ही त्यांना वरील प्रमाणे हकीकत सांगितली आहे. तसेच माझे व उदय किरपण यांचे समक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हाँईस रेकाँर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकाँर्ड झालेले संभाषण त्यांनी ऐकून त्याबाबत खात्री करून घेतली.

लोकसेवक उदय किरपण यांनी मला उदया सकाळी पोलीस स्टेशनमध्ये पैसे घेवून येण्याबाबत गुड्डूला सांगितले असल्याने सापळा कारवाई थांबवून दिनांक 04/06/2021 रोजी पुन्हा सापळा लावण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच माझेकडे दिलेली लाचेची रक्कम पुढील सापळा कारवाईकामी पोनि शिवराज बेंद्रे यांनी ताब्यात घेतली आहे.

दि. 04/06/2021 रोजी मुंब्रा फायर स्टेशन येथे षासकीय वाहनामध्ये सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोनि शिवराज बेंद्रे यांनी माझा मित्र अशरफ अली शेख उर्फ गुड्डू यांस त्याचे मोबाईलवरून मुंब्रा पोलीस स्टेशन येथील पोलीस उदय किरपण हे पोलीस स्टेशनमध्ये हजर आहेत का? याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे गुडडूने त्याचे मोबाईलवरून उदय किरपण यांना फोन केला असता, उदय किरपण यांनी फोन रिसीव्ह केले नाहीत. त्यानंतर पोनि षिवराज बेंद्रे यांच्या सुचनेप्रमाणे गुड्डूने मुंब्रा पोलीस स्टेषनमध्ये जावून उदय किरपण यांच्याबाबत खात्री केली असता, उदय किरपण हे पोलीस स्टेशनमध्ये हजर नसल्याबाबत माहिती मिळून आली होती. त्यामुळे सदर सापळा काढून घेण्यात आला होता.

दि.04/06/2021 रोजी नंतर मुंब्रा पोलीस स्टेशनमधील पोलीस उदय किरपण यांचा मला तसेच माझा मित्र अशरफ अली शेख उर्फ गुड्डू याला फोन आलेला नाही. मुंब्रा पोलीस स्टेशनमधील पोलीस उदय किरपण त्यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाचेप्रकरणी मी त्याचेविरूध्द तक्रार केली असल्याचा त्यांना दाट संशय आल्याची शक्यता असल्याने ते माझ्याकडून त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची आता शक्यता नाही अशी माझी खात्री झालेली आहे. तरी माझे दिनांक 03/06/2021 रोजीचे तक्रारीस अनुसरुन लोकसेवक उदय किरपण, पोलीस, मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

मला हिंदी व मराठी भाषा लिहीता व वाचता येत नसल्याने माझे तोंडी सांगणेप्रमाणे माझा फिर्यादी जबाब संगणकावर मराठी

Scanned with CamScanner

भाषेत टंकलिखीत करून तो मला वाचून दाखविला. तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा असल्याने मी त्याखाली इंग्रजीत सही करीत आहे.

Scanned with CamScanner